RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक
मार्गदर्शन मोफत
JUSTICE FOR ALL
ADVO CATE
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३०४५१

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

दि. ०१ ऑगस्ट २०२६



१९२० -
अण्णाभाऊ
साठे जयंती
१९१८ -
गुन्हेगार
जातीच्या
लोकांची हजेरी बंद करणारे आज्ञापत्रक
छत्रपती शाहू महाराजांनी काढले.
संकलन प्रा. यशवंत दुपटे

शनिवार ०१ ऑगस्ट २०२६ | वर्ष : ६ | अंक : २१२ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Saturday, 01 August 2026 | Year : 6 | Issue : 212 | Daily | Rate: Rs. 5/-

# २५० विद्यार्थ्यांसाठी फक्त १ टॉयलेट

## १३० विद्यार्थिनींना तासनतास रांगेत राहावे लागते उभे



हैदराबाद : तेलंगणातील निर्मल जिल्ह्यातून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. शहरातील मंजुळापूर येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्यंत मूलभूत सुविधांअभावी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या शाळेत २५० विद्यार्थी शिकतात, मात्र दुर्दैवाने संपूर्ण शाळेत वापरण्यायोग्य फक्त एकच टॉयलेट उपलब्ध आहे. यामुळे दररोज विद्यार्थ्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

या परिस्थितीचा सर्वाधिक फटका शाळेतील १३० विद्यार्थिनींना बसत आहे. शाळेत फक्त एकच टॉयलेट असल्याने मुलींना दररोज आपल्या नंबरसाठी लांबलचक रांगेत तासनतास उभे राहावे लागते. यामुळे त्यांना अत्यंत गैरसोयीचा सामना करावा लागत असून त्यांच्या अभ्यासावरही याचा थेट परिणाम होत आहे.

शाळेच्या वेळेत टॉयलेटची गरज असतानाही बराच वेळ वाट पाहावी लागत असल्याचे विद्यार्थिनींचे म्हणणे आहे. काही मुलींना स्वतःचा नंबर येईपर्यंत बराच वेळ त्रास सहन करत थांबून राहावे लागते. यामुळे त्यांना शारीरिक अस्वस्थता जाणवतेच, शिवाय वर्गात अभ्यासात लक्ष केंद्रित करतानाही प्रचंड त्रास होतो.

ही परिस्थिती सरकारी शाळांमधील शिक्षण आणि सुविधा सुधारण्याबाबत केल्या जाणाऱ्या मोठ्या-मोठ्या दाव्यांवर थेट प्रश्न उपस्थित करते. शाळांमध्ये पटसंख्या वाढवणे आणि शिक्षणाचा दर्जा सुधारण्यावर सतत भर दिला जातो, परंतु विद्यार्थ्यांना टॉयलेटसारखी अतिशय मूलभूत सुविधाही पुरवली जात नसेल, तर त्याचा थेट परिणाम त्यांच्या अभ्यासावर आणि दैनंदिन जीवनावर होत आहे. यावर पालकांनी संताप व्यक्त केला आहे. स्थानिक नागरिकांनीही या समस्येकडे तत्काळ लक्ष देण्याची मागणी शिक्षण विभागाकडे केली आहे. शाळेत लवकरात लवकर अतिरिक्त टॉयलेट बांधण्यात यावे आणि स्वच्छतेशी संबंधित सुविधा सुधाराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. ही समस्या वेळेत सोडवली नाही, तर विद्यार्थ्यांचं आरोग्य, त्यांची शाळेतील नियमित उपस्थिती आणि अभ्यासावर त्याचा खूप वाईट परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे

### मुलांवर उघड्यावर जाण्याची वेळ

**शाळेत मुलांची अवस्थाही यापेक्षा वेगळी नाही. टॉयलेट नसल्यामुळे अनेक मुलांना अखेर उघड्यावर जाण्यास भाग पाडलं जात आहे. ही परिस्थिती शाळेतील मूलभूत सुविधांच्या अभावाचा आणि प्रशासकीय निष्काळजीपणा दाखवत आहे. या सर्व प्रकारामुळे शाळेतील स्वच्छता व्यवस्था, विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि अभ्यासाच्या वातावरणावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका सरकारी शाळेत एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांसाठी केवळ एकच टॉयलेट असणे हे शिक्षण व्यवस्थेचे विदारक वास्तव समोर आणते.**

# विद्यार्थ्यांच्या आक्रोशाने भाजपाचे गणित बिघडले

नवी दिल्ली : 'नीट' पेपरफुटी प्रकरणात जबाबदारी निश्चित करण्याच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टीने दिल्लीतील जंतर मंतरवर महिनाभरापूर्वी आंदोलन सुरू केले होते. त्यामध्ये सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनीही सहभाग नोंदवून थेट आमरण उपोषणाला सुरुवात केली होती. सत्ताधारी भाजपाने सुरुवातीलाच या विषयाकडे गांभीर्याने बघितले असते, तर कदाचित परिस्थिती इतकी चिघळली नसती. पण या आंदोलनाचे गांभीर्य ओळखण्यात भाजपाने मोठी चूक केली आणि परिस्थिती हाताळताना त्यांचे राजकीय गणितही सपशेल चुकले. त्यामुळेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सध्या राजकीयदृष्ट्या अडचणीत सापडल्याचे मानले जात आहे.

पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी (२० जुलै) पोलिसांनी विद्यार्थ्यांवर केलेला लाठीमार आणि अश्रूधुराच्या नळकांड्यांचे थरारक दृश्य जेव्हा देशातील प्रत्येक मध्यवर्गीय कुटुंबाच्या घरात पोहोचले, तेव्हा या संतापाचा स्फोट झाला. सीएए म्हणजेच नागरिकत्व दुरुस्ती कायद्याविरोधातील आंदोलनाप्रमाणे केंद्र सरकारला विद्यार्थ्यांच्या चळवळीकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नव्हते. कारण, मध्यमवर्गीय मतदार हा सुरुवातीपासूनच पंतप्रधान मोदी यांचा पाठिराखा राहिलेला आहे. देशातील एकूण लोकसंख्येच्या तब्बल २४ टक्के हिस्सा असलेल्या तरुणांच्या या वाढत्या असंतोषाचा फटका उत्तर प्रदेश, पंजाब आणि गुजरात यांसारख्या राज्यांमध्ये पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये बसू नये, याच भीतीपोटी मोदी यांनी अखेर धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा स्वीकारून या वाढत्या संकटाला पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला.

# रिपब्लिकन नेत्या माया कांबळे यांचे निधन



नागपूर : आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या, रिपब्लिकन पक्षाच्या नेत्या आणि दैनिक बहुजन सौरभच्या पहिल्या अंकापासूनच्या वाचक माया कांबळे (वय ७०) यांचे दि. 31 जुलै 2026 रोजी पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने झोपेतच निधन झाले. त्यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीत हळहळ व्यक्त होत आहे. बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या महिला आघाडीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारून महिलांना संघटित करण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले. त्यांनी नागपूर महापालिका निवडणूक दोन वेळा लढविली होती. अल्प मतांनी पराभव झाला असला, तरी त्यांच्या कार्याची आणि जनसंपर्काची सर्वच राजकीय पक्षांकडून दखल घेतली गेली. राजकारणात सक्रिय राहूनही त्यांनी सामाजिक कार्य आणि कुटुंबाची जबाबदारी यांचा समतोल यशस्वीपणे सांभाळला. त्या उंटखाना चौक येथील हिमालय मेडिकल स्टोअर्सचे संचालक रुपेश कांबळे यांच्या मातोश्री होत.

चंद्रमणीनगर येथील रहिवासी असलेल्या माया कांबळे यांच्या पार्थिवावर मोक्षधाम घाटावर अंत्यसंस्कार पार पडले . दैनिक बहुजन सौरभ परिवारातर्फे माया कांबळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली .




# नवे शिक्षणमंत्री म्हणजे एक वाईट विनोद : यशस्विनी राजे सिंह



नवी दिल्ली : NEET पेपरफुटी प्रकरणावरून देशभरात झालेल्या आंदोलनांनंतर अखेर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. सुमारे ३६ दिवस चाललेल्या या अभूतपूर्व विद्यार्थी आंदोलनाला मोठा विजय मिळाला असला, तरी आता राजकीय वर्तुळातून आणि सत्ताधारी पक्षाशी संबंधित असलेल्या घटकांमधूनच सरकारवर टीका होऊ लागली आहे. उत्तर प्रदेशातील भाजपचे माजी आमदार विक्रम सिंह यांची मुलगी आणि प्रसिद्ध कंटेंट क्रिएटर यशस्विनी राजे सिंह हिने 'जेन-झी' च्या या आंदोलनाला उघड पाठिंबा दिला आहे. एवढेच नाही, तर तिने नव्या शिक्षणमंत्र्यांच्या नियुक्तीवर खरमरीत शब्दांत ताशेरेही ओढले आहेत. 'अल जझिरा'ला दिलेल्या एका विशेष मुलाखतीत यशस्विनीने आपली भूमिका स्पष्ट केली. "धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा ही काही खूप मोठी ऐतिहासिक क्रांती मानणे ही अत्यंत संकुचित विचारसरणी ठरेल," असे सांगत तिने प्रधान यांच्या राजीनामा पत्रातील भाषेवरही जोरदार आक्षेप घेतला.

'पश्चात्ताप नाही, तर स्वतःला शहीद दाखवण्याचा प्रयत्न' धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या राजीनामा पत्रात लिहिले होते की, 'विद्यार्थ्यांचे भविष्य खराब होऊ नये आणि देशविरोधी शक्ती या परिस्थितीचा गैरफायदा घेऊ नयेत' म्हणून ते पद सोडत आहेत. यावर भाष्य करताना यशस्विनी म्हणाली, "राजीनाम्याची भाषा पाहता, त्यात कोणतीही दिलगिरी किंवा पश्चात्ताप दिसत नाही. जबाबदारी स्वीकारण्याऐवजी स्वतःला हुतात्मा किंवा शहीद दाखवण्याचाच हा प्रयत्न वाटतो." तसेच, केंद्र सरकारने प्रल्हाद जोशी यांची नवे शिक्षणमंत्री म्हणून केलेली नियुक्ती अत्यंत निराशाजनक असल्याचे तिने म्हटले. "नवीन शिक्षणमंत्र्यांची निवड पाहता, हा एक फार वाईट विनोद वाटतो," अशा शब्दांत तिने सरकारवर निशाणा साधला. NEET पेपरफुटीविरोधात दिल्लीतील जंतरमंतर येथे झालेल्या आंदोलनात यशस्विनी स्वतः सहभागी झाली होती. 'कॉक्रोच जनता पार्टी' (CJP) या युवा आणि अराजकीय संघटनेने चालवलेल्या मोहिमेचे तिने भरभरून कौतुक केले.

# जखमी पोलिस कुटुंबीयांच्या पत्रकार परिषदेच्या प्रश्नावर राहुल गांधींचा संताप




नवी दिल्ली : दिल्ली पोलिसांच्या कुटुंबीयांनी आज पत्रकार परिषद घेत नीट आंदोलनादरम्यान जखमी झालेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना न्याय देण्याची मागणी केली. या पत्रकार परिषदेबाबत काँग्रेस नेते, खासदार राहुल गांधी यांना प्रश्न विचारला असता त्यांनी, "तुम्ही भाजपाचे आहात का?", असा प्रश्न पत्रकाराला केला. संसद परिसरात राहुल गांधींना पत्रकार परिषदेबाबत प्रश्न विचारला असताना त्यांनी असे विधान केले. संसदेच्या परिसरात काँग्रेसह विरोधी पक्षाकडून आज राम मंदिर गैरव्यवहार प्रकरणी अनोख्या पद्धतीने निदर्शन करण्यात आले. राहुल गांधी संसद परिसरातच असताना एका पत्रकाराने त्यांना दिल्ली पोलिसांच्या कुटुंबीयांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेबाबत प्रश्न विचारला. यावर प्रतिक्रिया देताना राहुल गांधींनी "तुम्ही भाजपाचे आहात का?", असा प्रतिप्रश्न पत्रकाराला केला.आज पोलिस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांनी पत्रकार परिषद घेतली. नीट आंदोलनादरम्यान जखमी झालेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना न्याय देण्याची मागणी कुटुंबीयांकडून करण्यात आली. अनेक अधिकारी अजून वैद्यकीय उपचार घेत आहेत असे पत्रकार परिषेदत बोलताना कुटुंबीय म्हणाले. पोलिस कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना होणाऱ्या त्रासाकडे दुर्लेक्ष केलं जात असल्याचे कुटुंबीयांनी म्हटले. दिल्ली पोलिस दलातील पोलिस उपनिरीक्षकांच्या मुलींने त्यांच्या वडिलांना जमावाकडून मारहाण केल्याचा आरोप केला.




# राम मंदिर देणगी अपहारप्रकरणी संसद परिसरात अनोखे निदर्शन



नवी दिल्ली : नीट पेपरफुटी आणि दिल्लीत आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जचा मुद्दा विरोधकांनी गेल्या काही दिवसांपासून उचलून धरला. संसदेच्या दोन्ही सभागृहात परीक्षा सुधारणा विधेयक मंजूर झाल्यानंतर आता विरोधक राम मंदिर देणगी गैरव्यवहार प्रकरणावरुन आक्रमक झाले आहेत. संसदेच्या परिसरात आज विरोधकांनी राम मंदिर देणगी अपहार प्रकरणाचे नाट्य रुपांतर करुन सरकारवर टीका केली. राम मंदिरातील पुजाऱ्यांना दिलेली देणगी घेऊन पळून जातात अशा पद्धतीचे नाट्य यावेळी संसदेच्या परिसरात सादर करण्यात आले. पप्पू यादव आणि राहुल गांधींनी या छोट्याशा नाटीकेत सहभाग घेतला होता. यावेळी विरोधकांनी अर्धगोल करुन घोषणाबाजी केली.

संसदेच्या परिसरात आज सर्व विरोधी पक्षातील खासदारांनी एकत्र येत राम मंदिर देणगी गैरव्यवहार प्रकरणी निदर्शन केले. यावेळी देणगी गैरव्यवहार घटनेचे नाट्य रुपांतर करण्यात आले. खासदार पप्पू यादव पुजाऱ्याची वेषातील कपडे परिधान करुन बसले होते. त्यांच्यासमोर दोन ते तीन देणगीच्या पेट्या ठेवण्यात आल्या होत्या. यावेळी राहुल गांधी देणगी घेऊन येतात आणि दान पेटीत पैसे टाकतात, दरम्यान, दान पेटीत पैसे टाकल्यानंतर पप्पू यादव दानपेटी घेऊन पळून जातात, अशा पद्धतीने हे पथनाट्य सादर करण्यात आले. यावेळी विरोधी पक्षातील खासदार अर्धगोल करुन उभे राहिले होते.

"राम मंदिरातील देणगी गैरव्यवहार करुन भाजपा-आरएसएसने देशातील कोट्यवधी रामभक्तांच्या श्रद्धेशी खेळ केला आहे, हे महापाप आहे", अशी टीका काँग्रेसकडून करण्यात आली आहे. "देणगी चोर – सिंहासन सोडा", असेही काँग्रेसने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. यावेळी काँग्रेसकडून मल्लिकार्जुन खरगे, प्रियांका गांधी, वर्षा गायकवाड, प्रणिती शिंदे, शिवसेना (उबाठा) गटाचे खासदार अरविंद सावंत यांच्यासह विरोधी पक्षातील खासदार उपस्थित होते.

1 August 2026 page 02_Layout 1 31-07-2026 04:42 PM Page 1



"दररोज थोडे शिका, जीवन पुढे जाईल..."

# संपादकीय

## सत्ता की संविधान?

अमित शहा यांनी राजीनामा द्यावाच का? हा प्रश्न एका व्यक्तीचा नाही, तर संविधान, लोकशाही आणि उत्तरदायित्वाचा आहे. भारत हा लोकशाही प्रजासत्ताक देश आहे. या देशाची खरी शक्ती कोणत्याही व्यक्तीमध्ये किंवा सत्ताधारी पक्षात नसून भारतीय संविधानात आहे. देशातील प्रत्येक मंत्री, प्रत्येक सरकार आणि प्रत्येक शासकीय संस्था संविधानाच्या चौकटीत राहून काम करण्यास बांधील आहे. त्यामुळे कोणत्याही केंद्रीय मंत्र्याच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले, तर त्यावर चर्चा होणे, चौकशी होणे आणि आवश्यक वाटल्यास नैतिक जबाबदारी स्वीकारणे ही लोकशाहीची मूलभूत अपेक्षा आहे. अलीकडे दिल्लीतील आंदोलनादरम्यान पोलिसांनी आंदोलकांवर केलेल्या कथित लाठीमार, अश्रुधूर, पेलेट गनच्या कथित वापरासह अन्य कठोर उपाययोजनांबाबत गंभीर आरोप करण्यात आले. या आरोपांची सत्यता स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशीतूनच स्पष्ट होऊ शकते. परंतु चौकशीची मागणी करणाऱ्यांनाच राजकारणाचा आरोप करून गप्प बसविणे हा लोकशाहीचा मार्ग नाही. ३० जुलै २०२६ रोजी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी हा विषय लोकसभेत मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांना पूर्णपणे बोलू दिले नाही, असा विरोधकांचा आरोप आहे. हा केवळ एका खासदाराचा अपमान नाही, तर कोट्यवधी मतदारांच्या प्रतिनिधित्वालाच मर्यादा घालण्याचा प्रयत्न आहे. संसदेत विरोधी पक्षाचा आवाज दाबला गेला, तर लोकशाहीचे संतुलनच बिघडते. भारतीय राज्यघटनेचे कलम १४ समानतेचा अधिकार देते. कलम १९ नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि शांततापूर्ण आंदोलन करण्याचा अधिकार देते. कलम २१ प्रत्येक व्यक्तीच्या जीवन आणि स्वातंत्र्याचे संरक्षण करते. या अधिकारांवर मर्यादा घालायच्या असतील, तर त्या कायदेशीर, आवश्यक आणि प्रमाणबद्ध असल्या पाहिजेत. अन्यथा राज्यसत्ता घटनात्मक मर्यादा ओलांडत असल्याचा प्रश्न निर्माण होतो. गृहमंत्री हे देशातील अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेचे सर्वोच्च राजकीय प्रमुख असतात. त्यामुळे पोलिसांच्या कारवाईबाबत अंतिम राजकीय उत्तरदायित्व त्यांच्यावर येते. कलम ७५(३) नुसार केंद्रीय मंत्रिमंडळ लोकसभेस सामूहिकरीत्या जबाबदार आहे. त्यामुळे संसदेला समाधानकारक उत्तर देणे आणि चौकशीस सामोरे जाणे ही घटनात्मक जबाबदारी आहे. भारतीय राजकारणात नैतिक जबाबदारी स्वीकारण्याची उज्ज्वल परंपरा आहे. रेल्वे अपघातानंतर तत्कालीन रेल्वेमंत्री लाल बहादूर शास्त्री यांनी कोणत्याही न्यायालयाने दोषी ठरविले नसतानाही नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला. याचप्रमाणे अनेक लोकशाही देशांमध्ये चौकशी निष्पक्ष व्हावी म्हणून मंत्री तात्पुरते पद सोडतात. कारण लोकशाहीत पदापेक्षा जनतेचा विश्वास मोठा असतो. मात्र आजचे चित्र वेगळे दिसते. कोणत्याही गंभीर घटनेनंतर प्रथम चौकशी जाहीर करण्याऐवजी विरोधकांवर टीका केली जाते. संसदेत चर्चा टाळली जाते. प्रश्न विचारणाऱ्यांनाच देशविरोधी किंवा विकासविरोधी ठरविण्याची प्रवृत्ती वाढत असल्याची टीका सातत्याने होत आहे. लोकशाहीत विरोधी पक्ष हा शत्रू नसतो; तो लोकशाहीचा आवश्यक आधारस्तंभ असतो. २००२ मधील गोध्रा आणि त्यानंतरच्या गुजरात दंगली या भारताच्या इतिहासातील अत्यंत दुःखद घटना आहेत. त्या संदर्भात विविध तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया झाल्या आहेत. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीविषयी न्यायालयीन निष्कर्षांशिवाय वैयक्तिक दोष निश्चित झाल्याप्रमाणे विधान करणे योग्य नाही. परंतु अशा घटनांनी शासनव्यवस्थेवर नेहमीच पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कायद्याच्या राज्याची कसोटी लावली आहे. प्रत्येक सरकारने या इतिहासातून धडा घेणे आवश्यक आहे. भारतीय सर्वोच्च न्यायालयाने अनेक वेळा स्पष्ट केले आहे की, राज्यसत्तेचा वापर न्याय्य, वाजवी आणि प्रमाणबद्ध असला पाहिजे. नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर परिणाम करणाऱ्या प्रत्येक सरकारी कारवाईची न्यायालयीन तपासणी होऊ शकते. त्यामुळे आंदोलनावरील कोणतीही पोलिस कारवाई ही टीकेच्या आणि चौकशीच्या पलीकडे असू शकत नाही. आजचा प्रश्न केवळ अमित शहा यांच्या राजीनाम्याचा नाही. प्रश्न असा आहे की, देशात मंत्री संसदेसमोर उत्तरदायी राहणार की नाही? सरकार लोकशाही मूल्यांचा आदर करणार की केवळ संख्याबळाच्या आधारे निर्णय घेणार? लोकशाहीत बहुमत सरकार बनवते; पण संविधानच शासनाला वैधता देते. जर एखाद्या घटनेनंतर जनतेमध्ये गंभीर शंका निर्माण होत असतील, संसदेत सातत्याने चर्चा आणि चौकशीची मागणी होत असेल, तर गृहमंत्र्यांनी संसदेसमोर सविस्तर निवेदन द्यावे, निष्पक्ष चौकशी जाहीर करावी आणि आवश्यक वाटल्यास नैतिक जबाबदारी स्वीकारण्याचा विचार करावा. लोकशाहीत उत्तरदायित्व टाळणे हे कोणत्याही सरकारला शोभणारे नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इशारा दिला होता की, संविधान कितीही उत्तम असले तरी ते राबविणाऱ्यांची वृत्ती लोकशाहीवादी नसेल, तर संविधान निष्प्रभ ठरू शकते. म्हणूनच आज गरज आहे ती व्यक्तिपूजेची नाही, तर संविधाननिष्ठेची. सरकार कोणत्याही पक्षाचे असो, सत्तेवर कोणताही नेता असो, संविधान, मूलभूत अधिकार, संसद आणि कायद्याचे राज्य यांच्यापेक्षा कोणीही मोठा असू शकत नाही. राजीनाम्याची मागणी ही सूडाची भावना नसून उत्तरदायित्वाची मागणी आहे. चौकशी, पारदर्शकता आणि संसदेसमोरील जबाबदारी हीच लोकशाहीची खरी ओळख आहे. सत्तेचे खरे सामर्थ्य प्रश्न दडपण्यात नसते; तर प्रश्नांना धैर्याने उत्तर देण्यात असते.●●

# कृतीशीलतेवर विश्वास ठेवणारे अण्णाभाऊ साठे

**आपल्या शाहीरीने आणि पहाडी आवाजाने संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक मिळवणाऱ्या अण्णाभाऊंचे खरे नांव तुकाराम भाऊराव साठे होते. 1 ऑगस्ट 1920 रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगांव येथील त्यांचा जन्म! उदरनिर्वाहासाठी आपल्या आईवडिलांसोबत वाटेगाव सोडून मुंबईला आले. घाटकोपरच्या झोपडपट्टीत आसरा घेतला. पोटाची खळगी भरण्यासाठी मिळेल ते काम करू लागले. या काळात त्यांनी कोळसेवाला, घरगडी, खाण मजूर, डोअर किपर, पेंटर, तमाशातला सोंगाड्या अशी विविध कामे केली. परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. परंतु मुंबईतील दुकानाच्या पाट्या, बोर्ड वाचून अक्षरज्ञान मिळवले. अण्णांचा आवाज अतिशय सुरेल, वाचनाची आणि वादनाची आवड! त्यामुळे ते स्वतः पोवाडे लिहू आणि गाऊ लागले.**



पोवाडा व लावणीच्या कथा शैलीने आण्णाभाऊ अल्पकाळात लोकप्रिय बनले. त्यांचे विचार कार्य विविध जनसमुदाय पर्यंत पोहचले. ग्रामीण रूढी परंपरा, अंधश्रद्धा आणि कर्मकांडामधून मुक्त करण्यासाठी त्यांनी प्रथम 'फकीरा' नावाची कादंबरी लिहिली. अस्पृश्य समाजातील 'फकिरा' हा विद्रोही नायक उभा केला. प्रस्थापित व्यवस्थेत 'नाही रे' वर्गाचे साहित्य यापूर्वी कोणी मांडले नव्हते. अण्णाभाऊनी 'फकीरा' ही अजरामर कादंबरी डॉ. बाबासाहेबांच्या लेखणीला अर्पण केली. "मुंबईची लावणी" आणि "मुंबईचा गिरणी कामगार" या दोन गाण्यांतून त्यांनी मुंबईला शोषणकारी व अन्यायपूर्ण संबोधले. त्यांच्या साहित्यात ग्रामीण, दलित, शोषित वर्गाचे जीवंत चित्रण असायचे. उच्चवर्णीयांची भारतावर एकछत्री सत्ता अण्णाभाऊना मान्य नव्हती. त्या विरोधात 16 ऑगस्ट 1947 रोजी त्यांनी मुंबई येथे वीस हजार लोकांचा मोर्चा काढला होता. त्या मोर्चातील मुख्य घोषणा होती "ये आजादी झुठी है, देश की जनता भूखी है." 1958 मध्ये झालेल्या पहिल्या दलित साहित्य सम्मेलनाचे ते उद्घाटक होते. तेव्हा अण्णाभाऊ म्हणतात, 'पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे." या विचारांतून त्यांनी दलित व कामगार वर्गाचे महत्व अधोरेखित केले होते. त्यांनी केवळ समाज जागृती, सामाजिक परिवर्तनासाठी लेखन केले. अण्णांच्या शाहिरीने लोकांना संघर्षाची प्रेरणा मिळाली. अत्यंत गरिबीतही स्वाभिमानी राहून त्यांनी पैशासाठी कधी लिखाण केले नाही. कामगार चळवळीत राहून अण्णाभाऊंनी श्रमिक, शेतमजूर आणि दलितांचे जीवन अनुभवले. सुरुवातीला ते कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या साम्यवादी विचारसरणीने प्रभावित होते. त्यांना रशियामध्ये जाण्याची संधी मिळाली. तिथे त्यांचे भव्य स्वागत झाले. त्यांची पहिलीच कादंबरी "चित्रा" ही रशीयन भाषेत रशियात प्रकाशित झाली. अन्य कथा, कादंबऱ्या, पोवाडे, वैचारिक साहित्य रशियन भाषेत प्रसिद्ध झाले होते. लेनिन ग्रँड वरील त्यांचा पोवाडा तर प्रचंड गाजला. त्यांच्या 21 कथासंग्रह आणि 35 कादंबऱ्या पैकी 7 कादंबऱ्यावर चित्रपट निर्माण झाले. "फकीरा" या कादंबरीला 1961 मध्ये राज्य शासनाचा उत्कृष्ट कादंबरीकार असा पुरस्कार मिळाला. त्यांचे साहित्य आंतरराष्ट्रीय शिक्षण संस्थांच्या अभ्यासक्रमाचा भाग बनले. एका निरक्षर माणसाने साहित्यक्षेत्रात आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले. 1950 ते 1962 चा काळ अण्णाभाऊंच्या साहित्य क्षेत्रातील सुवर्ण काळ समजला जातो. या काळात त्यांच्या पुस्तकांच्या अनेक आवृत्ती निघाल्या. महाराष्ट्रात कुठेही अन्याय-अत्याचार झाला की, तो लगेच त्यांच्या शाहीरीतून रोष व्यक्त होत असे. त्यामुळे तत्कालिन मुंबई सरकारने त्यांच्या "लालबावटा" या कलापथकावर बंदी घातली. पुढे त्यांच्या तमाशावरही बंदी आणली. परिणामी अण्णाभाऊंनी पर्यायी व्यवस्था म्हणून तमाशाचे लोकनाट्यात रूपांतर केले आणि तमाशा ही कला जीवंत ठेवली. लोकनाट्यामुळे सरकारची बंदी निरर्थक ठरली. तत्कालीन परिस्थितीत समाजात जनजागृती करण्याच काम त्यांच्या वगनाट्यांनी केले. त्यांच्या शाहिरीने लोकांना नवीन ऊर्जा मिळत असे. अण्णाभाऊ लोकनिष्ठ आणि देशनिष्ठ शाहिर होते. ते म्हणतात, "जो जनतेची कदर करतो, जनता त्याचीच कदर करते. माझा या देशावर, या जनतेवर अढळ विश्वास आहे. ते म्हणतात, 'भारत सुखी, समृद्ध व्हावा, येथे समानता नांदावी' याची मला रोज स्वप्न पडत असतात. हीच स्वप्ने पाहत पाहत मी लिहीत असतो. अर्थात अण्णाभाऊ हे मराठी समाजसुधारक, लोककवी, राजकीयदृष्ट्या कृतीशीलतेवर विश्वास ठेवणारे व्यक्ती होते. भारत सरकारने 1 ऑगस्ट 2001 रोजी, त्यांच्या जन्मदिनी टपाल तिकीटावर अण्णाभाऊंचे चित्र ठेवले होते. शासनस्तरावर मागासवर्गासाठी 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ' कार्यरत आहे. महाराष्ट्रात दरवर्षी अण्णाभाऊ साठे साहित्य सम्मेलन आयोजित करण्यात येत असतात.



श्रीराम बनसोड,
8208617748

१९४९ मध्ये मुंबईत अण्णाभाऊ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट झाल्याचा उल्लेख सापडतो. या भेटीने अण्णाभाऊंना चळवळीत काम करण्याची नवी उर्जा मिळाली. मार्क्सवादी विचारसरणी मानणारे असले तरी अण्णाभाऊच्या साहित्यावर, जीवनावर आंबेडकरी विचारांचा प्रभाव होता. शेवटी आंबेडकरी चळवळ त्यांनी आपल्या लोकनाट्यातून पुढे आणली. त्यांनी 'बुद्धाची शपथ' आणि 'सापळा' यांसारख्या कथांतून धर्मांतराचा दलितांवर झालेला प्रभाव रेखांकित केला. 'भाकरीपेक्षा इज्जत आणि स्वाभिमान प्यारा आहे' या आंबेडकरी विचाराने ते प्रेरित होते. अण्णाभाऊ म्हणतात, "जग बदल घालूनी घाव, सांगून गेले आम्हा भीमराव." आंबेडकरी साहित्याचा मातंग समाजावर फारसा प्रभाव दिसत नाही. त्यांनी शिक्षणात प्रगती केली नाही, परंतू महारांनी आमचे आरक्षण खाल्ले म्हणून त्यातील एक गट बौद्धांचा द्वेष करत आहे. त्यामुळे उपवर्गीकरणाचा प्रश्न ऐरणीवर आहे. साहित्य क्षेत्रात जगप्रसिद्ध झालेला हा कलाकार काही दुर्दैवी संघर्षामुळे खचत गेला. शेवटच्या काळात अण्णाभाऊंना उपासमार झाली. वयाच्या ४९ वर्षात 18 जुलै 1969 रोजी मुंबई येथे अण्णाभाऊंचे निधन झाले. या महान लोकशाहीरास त्यांच्या जयंती प्रित्यर्थ विनम्र अभिवादन!●●

# आदिवासींमधील नेतृत्व त्यांचा पक्ष आणि समीक्षा

आदिवासींमध्ये भारतात जवळ जवळ ७०५ जाती-उपजाती आहेत. यापेक्षा कितीतरी मोठ्या संख्येने आदिवासींच्या संघटना आहेत, त्यात काही जातींच्या नावाने, काही समाजाच्या नावाने, काही राजकीय पक्षाच्या नावाने, काही कर्मचाऱ्यांच्या नावाने तर, काही आदिवासीच्या नावाने. या संघटनांचे नेतृत्व करणारे, पुढारी प्रामुख्याने आदिवासीच आहेत आणि ते सदगृहस्थ अर्धेअधिक कुठल्यातरी, गैर-आदिवासी राष्ट्रीय पक्षाशी जुळलेले आहेत. उदाहरणा दाखल सांगता येईल. श्री. सोमजीभाई दामोर, ८ वेळा खासदार (पक्ष कांग्रेस) आता बीजेपी. अध्यक्ष, अखील भारतीय आदिवासी विकास परिषद, फग्गन सिंह कुलस्ते ६ वेळा खासदार (पक्ष बीजेपी), उपाध्यक्ष अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद. श्री. शिवाजीराव मोघे, पक्ष कांग्रेस आणि आ. भा. आदिवासी वि. परिषदे मध्ये मोठ्या पदावर. श्री. मरकाम साहेब, केंद्रीय अध्यक्ष, गोंडवाना गणतंत्र पार्टी, आमदार मध्यप्रदेश (पक्ष बीजेपी) झारखंडचे मुख्यमंत्री श्री. हेमन्त सोरेन, पक्ष-झारखंड मुक्ति मोर्चा. छत्तीसगडचे मुख्यमंत्री आदिवासी, पक्ष-बीजेपी. मुख्यमंत्री-ओडिसा, आदिवासी पक्ष-बीजेपी. असे भरपूर उदाहरणे सांगता येईल. संघटना भरपूर, नेत्यांची सख्या भरपूर अस्तित्वात असले तरी, आदिवासी आज सर्वांत जास्त शिक्षणात मागे, राजकारणात मागे, नोकरीत मागे उद्योगधंदयात मागे, आरोग्यात मागे, भुकमरीत पुढे, बाल मृत्यूत पुढे, विस्थापनात पुढे, जल-जंगल-जमीनीच्या मालकीहक्का पासून वंचित, आदिवासी आरक्षणातील हिस्सेदारी नाममात्र, अधिकतर हिस्सा, अतिक्रमणात गेलेले आहे,

> **मचे आदिवासी राजे-महाराजांनी १७५० वर्षे या भारत भूमीवर राज्य केले, आमची जमात शासक वर्गीची जमात होती. इंग्रज येण्याआधी भारतात जे ५६५लहान लहान राज्य होते त्यापैकी २५८राज्य आदिवासींचे होते, हा इतिहास नेहमीच समाज बांधवांकडून ऐकायला मिळतो. १५ नोव्हेंबर बिरसा मुंडा जयंती, ९ ऑगष्ट विश्वमुलनिवासी दिवस, २४ जून विरांगणा महाराणी दुर्गावती बलिदान दिवस, समाज मोठ्या उत्साहाने, वाजा-गाज्यात, ढोल-डिजे वाजवून, रैली काढून, हजारो रुपए खर्च करून साजरा करीत असतो.**



अत्याचार निवारण कायदा, नाकामी ठरलेला आहे, पोलिस आणि अपराधी पक्ष यांच्या मिलीभगत मुळे, आदिवासीला पाहिजे तसा न्याय मिळत नाही. अफाट कचाट्यात सापडलेला हा आदिवासी देशाचा नागरिक आहे की नाही, शंका निर्माण होत आहे. देशाच्या फाळणीनंतर बाहेरून लाखो लोग आलेत, शरणार्थी होते, पण आज उद्योगधंदयात, व्यापारी क्षेत्रात त्यांचा दबदबा आहे. त्यांच्या स्वतःच्या समाजाच्या शाळा-कॉलेज आहेत, दवाखाने आहेत, धर्मशाळा आहेत, मोठाले समाजभवन आहेत, सभागृहें आहेत, ७५ वर्षाच्या राजकारणात एक उपप्रधानमंत्री (लालकृष्ण आडवाणी) निर्माण केलेत. चला दुसरीकडे पाहू या, ज्या समाजाला निकृष्ट जात, अस्पृश्य जात समजून, कुणी सहसा आंगणात उभे राहू देत नव्हते, माणूसच समजत नव्हते, जनावर समजून व्यवहार करीत होते, असा तो बहिष्कृत समाज, ज्याला आज बुद्धिष्ट म्हणतो, तो समाज आज, ब्राह्मणांची बरोबरी करीत, प्रत्येक क्षेत्रात योग्यतावान बनलेला आहे. स्वतःच्या संस्थांच्या शाळा-कालेजेस आहेत, दवाखाने आहेत, शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी वसतिगृहे आहेत, राजकारणात पुढे आहेत, त्यांचेकडे एक मजबुत वोटबँक आहे, संघटीत आहेत, संघर्षशील आहेत, शिक्षण क्षेत्रात अग्रेसर आहेत, गली-मोहल्यात विहार आहेत, जागोजागी डॉ. आंबेडकर भवन आहेत, सभागृहे आहेत, आरक्षणाच्या आणि कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर आंदोलनके उभारून, सर्वांत पुढे राहतात, समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचारावर प्राणाची बाजी लावून लढा देतात, हिंदू-सणावारांना पूर्णपणे त्यागून दिलेले आहे, लग्नात, तेरवित, फजूल खर्ची-दिखावा टाळतात, पैशाची उधळपट्टी करीत नाही, ज्ञानदेवता व मार्गदाता, तथागत बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना तो समाज, आपला सर्वस्व अर्पण करून, त्यांनी सांगितलेल्या सद्मार्गाचा अनुकरण करून जीवन जगत आहे. नागपूर शहरात असलेल्या, दीक्षाभूमीवर, ६ डिसेंबरला, १४ एप्रिलला धम्म उपासक-उपासिका निरंतर भेट देतात, १४ ऑक्टोबरला (धर्मचक्र प्रवर्तन दिनी) तर, पुर्ण भारतातून लाखों लोक त्या ठिकाणी येतात. आल्यावर तथागत बुद्ध आणि डॉ. बाबासाहेबांच्या मुर्तिला नुसते हात जोडत नाही, तर, शपथ घेतात, कसला, मी हिंदू धर्मातील काल्पनिक देवीदेवतेची पुजा करणार नाही, हिंदू धर्मातील अंधश्रद्धेला बळी पडणार नाही, माझ्या कुटुंबातील कोणत्याही कार्यक्रमाला, ब्राह्मणाला बोलावणार नाही, मी नशाखोरी करणार नाही, परिस्थिति कोणतीही असली तरी, मुला-बाळांना शिक्षण देणारच, करुणा-शिल-शांती या तत्वावर जीवन जगणार. याठिकाणी येणारी व्यक्ति केवळ बदधिष्ट नसते, तर स्वतःला शपथ देउन, परिवर्तनवादी होण्याचा संकल्प करते, क्रांतीकारी बनते, कारण आहे, ती पावण-दीक्षाभूमी आणि खऱ्या अर्थाने ती क्रांतीभूमी आहे, असे मी मानतो. आदिवासीमधील, अशाच क्रांतिभूमीची शोध घेत आहो, जेणेकरून माझा आदिवासी समाज, त्या क्रांतिभूमीला नतमस्तक होवून, आपल्या जीवनमानात परिवर्तन आणण्यासाठी, बुद्धिष्ट बांधवानसारखे त्याठिकाणी शपथ घेईल. शिवाय, जे लोक आदिवासी असून, काही गैर-आदिवासी संघटनांमध्ये/ पक्षामध्ये काम करतात आणि जो पक्ष आदिवासींच्या विरोधात delisting, ucc, परिसिमन आणत आहे, वनवासी कल्याण आश्रम, शबरी कल्याण आश्रम, जनजातीय सुरक्षा मंच निर्माण करुन, आदिवासींचे Indinigious, aboriginal (मुळनिवासी/ मुळधनी) अंतरराष्ट्रीय परिचय व अस्तित्व संपविण्यासाठी काम करीत आहे, अशा कामात जुळलेल्या आदिवासींचा आणि गैर-आदिवासींचा खरा चेहरा, ओळखण्याची संधी, समाजाला नक्कीच मिळेल, यात शंका नाही.●●



प्रभुलाल परतेती
मो. 9422818921

# पहिल्या वर्गात 'वाघोबाचा काटा काढला'

## हे पुस्तक बक्षीस मिळाले! मी पुस्तक वाचायला शिकलो!



माझा जन्म ५ जानेवारी १९५९ रोजी टीमकी या मागास वस्तीत झाला. नागपूरच्या भानखेडा, मोमीनपुरा भागात मानवी वस्त्या दाटीवाटीने होत्या. तेलीपुरा, कोष्टीपुरा, खाटीकपुरा, कलारपुरा, मांगपुरा, चांभारपुरा अशा वर्गीकृत लोकवस्त्या होत्या. कॉर्पोरेशनची दोन मजली शाळा, बाजूलाच सार्वजनिक शौचालय आणि चार भिंतींतील छोटेसे खुले मैदान होते. काही घरांमध्ये शौचालय होते, तर अनेक घरांमध्ये भाडेकरू कोंबडीच्या खुराड्यासारख्या लहान-लहान खोल्यांमध्ये राहायचे.

खडीगंमत, तमाशा, कीर्तन, भारूड, रामलीला असे सांस्कृतिक कार्यक्रम वर्षभर असायचे. आखाड्यात शरीर कसणारी तरुण पिढी, मांगठ्यावर लुगडे विणणारे कोष्टी बांधव, त्यांच्या मांगठ्यांचा सुमधुर आवाज, मंदिरांनी वेढलेला परिसर, त्यातील घंट्यांचा आवाज, वारकरी भजन मंडळे या सर्वांनी सरमिसळ संस्कृती शिकवली. कबुतरे, कोंबड्या, बकऱ्या पाळणारे शौकीन या दाटीवाटीच्या वस्तीत भेटायचे.

श्रमिकांच्या वस्त्या, दारूचे अड्डे, त्यातील भांडण, चाकू-सुरे, तसेच सार्वजनिक नळावरील भांडणे हे बालमनाने पाहिले. परंतु मोहल्ल्यातील सार्वजनिक आणि कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये सर्वांचा सहभाग जाती-धर्मापलीकडे होता. कितीही मोठा गुंड असला तरी मोहल्ल्यातील मान्यवर - मग ते रामराव काका, रामटेके मामा किंवा गफ्फार चाचा असोत त्यांच्यासमोर नतमस्तक व्हायचा. त्यांच्या शब्दाला किंमत होती. त्यामुळे अनेक भांडणे सहज मिटायची. वयोवृद्ध आजीचा मोहल्ल्यात सन्मान व्हायचा. तिच्या बोलण्याने कौटुंबिक भांडणे थांबायची.

टीमकी आणि भानखेड्यात आमच्या रक्षक परिवाराचे भाड्याच्या घरात लहानसे किराणा दुकान होते. जळाऊ लाकडी काड्यांची वखार आणि मोमीनपुरा चौकात एकमेव हिंदूचा पानठेला होता, ज्याला 'पान-मंदिर' म्हणत. संयुक्त कुटुंब, आई, वडील, पाच काका-काकू, आजोबा-आजी आम्ही लहान-लहान खोल्यांमध्ये राहायचो. आजोबांचे निधन टीमकीमध्येच झाले. आजोबांच्या तेरावीला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची उपस्थिती होती. ते मी चिमुकल्या डोळ्यांनी पाहिले. मी राष्ट्रसंतांसमोर पंक्तीत श्लोक म्हटला होता, ते आजही स्मरणात आहे. कारण तेव्हा माझे वय बालवाडीत जाण्याचे होते. एका वर्षात दोन मंदिरांच्या आवारात आमची बालवाडी भरल्याचे आठवते. बालवाडीची सहल एखाद्या बागेत गेल्याचेही आठवते. ते वर्ष होते १९६४, आजोबांच्या निर्वाणाचे वर्ष. मुले चांगल्या शाळेत शिकावीत म्हणून वडील दुर्गादासजी रक्षक यांनी मला, लहान काकांना, मोठ्या बहिणीला आणि मोठ्या भावाला सिव्हिल लाईन भागातील मुख्यमंत्र्यांच्या सचिवालयातील चौकीदाराच्या आऊट हाऊसमध्ये ठेवले. तेव्हा सचिवालय फक्त हिवाळी अधिवेशनातच उघडायचे. नंतर सर्व परिसर आमचाच होता.

आमचे लहान काका हडस हायस्कूलमध्ये, मोठी बहीण सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूलमध्ये, भाऊ सेंट उर्सुला येथील मुलांच्या प्राथमिक शाळेत, तर माझा प्रवेश पहिल्या वर्गात 'मिशनरी बोर्ड मराठी प्राथमिक शाळा' धरमपेठ, आजचे बिशप कॉटन येथे झाला. त्याआधी रवीभवन क्वार्टरमधील बालवाडीतही मी होतो. पहिल्या वर्गात शिकत असतानाच रक्षक परिवाराचे विश्वकर्मा नगर येथे नाल्यालगतच्या जमिनीवर स्वतःचे घर उभारले. बांधकामाच्या देखरेखीसाठी आई सावित्री एकटी तिथे राहायची. आम्ही धरमपेठच्या शाळेतून पायी, फाटके दप्तर आणि पाटी सांभाळत विश्वकर्मा नगरला यायचो. पाच-सहा महिने ही पायपीट चालली. तो बालवयातील वेगळाच आनंद होता.

एकदा आईने शाळेतून येताना रस्त्यावर गाईचे शेण सापडल्यास आणायला सांगितले. दप्तराच्या पिशवीत पाटी-पेन्सिलसोबत शेणाची पिशवी. धरमपेठहून घराकडे येताना अजनी रेल्वे स्टेशनजवळ खूप शेण दिसले. आनंदाने पिशवी भरली आणि डोक्यावर घेतली. दप्तर, पिशवी, काखेत जेवणाचा लहानसा जर्मनचा डबा शेणाजवळच विसरलो. थकून घरी पोहोचलो. आईला आनंदापेक्षा डबा हरवल्याचे दुःख झाले. पुन्हा पायपीट करीत तिच्यासोबत अजनी स्टेशन गाठले, पण डबा मिळाला नाही. सकाळी पाहिले तर पिशवीत गाईचे शेण नव्हते, तर घोड्याची लीद होती. स्टेशनसमोर तेव्हा घोडागाड्या असायच्या.

पहिल्या वर्गात मी पाचव्या क्रमांकाने उत्तीर्ण झालो. मुख्याध्यापकांच्या हस्ते सन्मान म्हणून 'वाघोबाने काटा काढला' हे गोष्टीचे पुस्तक बक्षीस मिळाले. त्या पुस्तकाने बालवयातच वाचनाची गोडी लावली.

घरी किराणा दुकानात चांदोबा, मृत्युंजय कॉमिक्स, गोष्टींची छोटी पुस्तके मिळायची. पेपर रद्दीतून साहित्य, कादंबऱ्या, जुनी पुस्तके विकत घ्यायचो. त्यातून वाचनाची आवड वाढली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतरानंतर बौद्ध बांधवांकडून रद्दीत आलेली रामायण, महाभारत, तुकाराम गाथा, महापुरुषांची चरित्रे ही बाबांनी जपलेली ग्रंथालमारी उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये माझे वाचन वाढवत होती. मनोहर कहाण्या, सत्यकथा वाचल्या, परंतु त्यातील कथांमुळे विकृत मानसिकता बनू शकते असे वाटल्याने ते वाचन थांबवले. असा वाचनाचा प्रवास बोजड न होणाऱ्या वाचनाकडे वळला. राष्ट्र संत तुकडोजी महाराजांचे साहित्य, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगे बाबा यांच्या अल्पशा साहित्याने समाज वाचायला शिकवले. आज समाज वाचतो आणि लेखनाची आवड १९७९ पासून सातत्याने जोपासतो. साधे, सोपे, सहज बोली शब्द माझ्या लेखनातून भावना व्यक्त करतात. लेखनातून जीवनाचा आनंद घेता येतो.●●

- ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक
मो.9823966282

# कॉ. पाटणे अन्यायाविरूद्ध संघर्षाची प्रेरणा देणारा एक झुंजार व आदर्श कामगार नेता

**आदरणिय कॉमरेड आर. एन. पाटणे यांना हार्दिक शुभेच्छा व वाढदिवसानिमित्य मंगल कामना**

कॉ. पाटणे आपले ८३ वर्ष पूर्ण करीत आहेत. या वाढदिवसानिमित्त त्यांच्याशी त्यांच्याप्रती सद्भावनांचे प्रतिक म्हणून माझ्या भावना व्यक्त करीत आहे. मी १९७१ ते १९७९ नागपूर विभागीय कार्यालयातील P & I R Deptt. च्या भव्य हॉल मध्ये शेवटच्या कोपऱ्यात Typing Post मध्ये कार्यरत असतांना मला त्यांच्या झुंजार व लढवय्या नेतृत्वाचा प्रत्यय आला. कर्मचाऱ्यांच्या समस्यांबद्दल ते जेव्हा A.D.M.(P & I R) या मोठ्या अधिकाऱ्याकडे चर्चा करायला जात होते, तेव्हा त्यांच्याशी इंग्रजीत जोरदार युक्तीवाद करतांना मी पाहिले. त्या अधिकाऱ्याला निरूत्तर करतांना त्याची भंबेरी होत असे आणि त्यांचा धारदार आणि मोठा आवाज संपूर्ण हॉलमध्ये गुंजून जात असे आणि सर्व कर्मचारी काम सोडून त्यांचा जोरदार युक्तीवाद ऐकत असत. असा झुंजार व लढवय्या कामगारांचा नेता मी पहिल्यांदा पाहिला. एवढेच नव्हे तर आपल्या कर्मचाऱ्यांच्या वैयक्तीक व कौटूंबिक सुखदुःखात रात्री-बेरात्री आपल्या तब्येतीची पर्वा न करता धावून येणारा व तन मन धनाने झटणारा नागपूरातील कामगार नेता मी पहिल्यांदा पाहिला. अशा झुंजार नेतृत्वाला उदंढ आयुष्य लाभो, हिच त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभकामना!

"Alsp best wishes to all his family members. कॉ. पाटणेजींना शुभकामना देतांना एका कवीच्या खालील ओळी मला या क्षणाला आठवतात :- "नई सुबह इतनी सुहानी हो जाए, आपकी दुःखोकी सारी बात पुरानी हो जाए। दे इतनी खुशीयाँ, ये दिन आपको की, खुशीयाँभी आपके मुस्कुराहटकी दीवानी हो जाये।"

- वाय. टी. भगत

# वाचकांचे विचारपिठ

## अत्याचार पीडित मुलीला खाजगली रूग्णालयात वेळेवर उपचार न करणाऱ्या डॉक्टरांची सनद रद्द करावी!

नुकतेच उत्तर प्रदेशातील गाजीयाबाद शहरामध्ये चार वर्षाच्या हत्या झालेल्या बलात्कारी मुलीला वेळेवर उपचार न करणाऱ्या खाजगी रूग्णालयातील डॉक्टरांना सर्वोच्च न्यायालयाने कडक शब्दात फटकारून पिडीतेच्या कुटूंबांना पुरेशी नुकसान भरपाई देण्याचे निर्देश दिले. इतकेच नव्हे तर सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश डॉक्टरांना म्हणाले, 'जर तुम्ही जर तुमचे कर्तव्य पार पाडू शकत नसाल तर तुम्हाला तुमच्या नावापुढे 'डॉक्टर' ही उपाधी लावण्याचा कोणताही अधिकार नाही.जर तुम्हाला उपचाराचा खर्च परवडत नव्हता तर तुम्ही त्या अत्याचार पिडीत मुलीला स्वतः दुसऱ्या रूग्णालयात न्यायला हवे होते. ती गरीब होती म्हणून तुम्ही तिच्याकडे दुर्लक्ष केले का? तुम्हाला तिची फी परवडत नव्हती का? वरील टिपण्णी सर्वोच्च न्यायालयाद्वारा संबंधीत डॉक्टरांना तिव्र शब्दात फटकारले. आज भारतातील खाजगी रूग्णालय रूग्णांशी मनमानी फी आकारून गरीबांना जीवदान देण्याऐवजी भिकेला लावण्याचे कार्य करीत आहे. उपरोक्त अत्याचारपिडीत मुलीला वेळेवर उपचार मिळाले असते तर जीव वाचला असता. शासनाच्या वैद्यकीय शिक्षणावर लाखो रूपये खर्च करून डॉक्टर झालेले विद्यार्थी मानवी संवेदना विसरून फक्त पैशासाठी व्यापार करणारे डॉक्टर मानवजातीला कलंक आहेत. म्हणून शासनाने अशा संवेदनहिन डॉक्टरांची सनद रद्द करून जनतेला न्याय मिळवून द्यावा.

- ॲड. बाबू मेश्राम

## प्रविण कांबळे सर ...

अभ्यासपूर्ण माहिती आणि येणारी पिढी जर आंबेडकरी कव्वाली या विषयावर संशोधन करेल तेव्हा त्यांना या सर्व दस्तऐवजाची गरज पडेल. त्यामुळे आज आपण यांची संशोधन करीत आहेत ते येणाऱ्या पिढीसाठी उपयुक्त आहे. अतिशय सुंदर आणि उपयुक्त अशी माहिती आपण लिहिलेली आहे. आपले मनापासून धन्यवाद आणि अशीच माहिती किंवा अशाच प्रकारचे संशोधन करावे आणि ते समाजापुढे विद्यार्थ्यांपुढे आणावे. आपल्या पुढील संशोधनासाठी सदिच्छा...

- प्रा. विक्रांत मेश्राम

“ विचार बदला, तुमचे जग आपोआप बदलेल... ”



# जंतर-मंतरवर आंदोलनाचा थरार
# तरुणाईने ठेचला सत्तेचा अहंकार

नवी दिल्लीतील जंतर-मंतर हे भारतीय लोकशाहीतील संघर्ष आणि जनआंदोलनांचे ऐतिहासिक केंद्र मानले जाते. याच ठिकाणी राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (नीट) संदर्भातील कथित घोटाळे, प्रश्नपत्रिका फुटी, परीक्षा प्रक्रियेतील अपारदर्शकता आणि लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी झालेल्या अन्यायाविरोधात देशभरातील विद्यार्थी, पालक आणि विविध विद्यार्थी संघटनांनी तब्बल ३६ दिवस बेमुदत आंदोलन केले. 'कॉकरोच जनता पार्टी' या उपहासात्मक सामाजिक-राजकीय चळवळीच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या या आंदोलनाने केवळ परीक्षाव्यवस्थेतील त्रुटींवर प्रश्न उपस्थित केले नाहीत, तर उत्तरदायी शासन, पारदर्शक प्रशासन आणि तरुणांच्या घटनात्मक हक्कांसाठी व्यापक लोकशाही लढ्याचे स्वरूप धारण केले. आंदोलनादरम्यान आंदोलकांवर अश्रुधूर, लाठीमार आणि पाण्याचे फवारे यांचा वापर करण्यात आला. तरीही आंदोलन अहिंसक राहिले. वाढत्या जनदबावामुळे केंद्र सरकारला चर्चेचा मार्ग स्वीकारावा लागला. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची घोषणा आणि आंदोलनकर्त्यांच्या अनेक मागण्या मान्य झाल्याने हा संघर्ष भारतीय तरुणाईच्या संघटित शक्तीचे प्रतिक ठरला. या आंदोलनाची सुरुवात १६ मे २०२६ रोजी सामाजिक माध्यमांवरील विश्लेषक आणि कार्यकर्ते अभिजीत दीपके यांनी स्थापन केलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी' या व्यंगात्मक चळवळीपासून झाली. सत्तेतील अहंकारावर उपरोधिक भाष्य करणे, उत्तरदायित्वाची मागणी करणे आणि तरुणांचा आवाज राष्ट्रीय स्तरावर पोहोचवणे हा तिचा उद्देश होता. सर्वोच्च न्यायालयातील एका सुनावणीदरम्यान तरुणांविषयी झालेल्या वादग्रस्त टिप्पणीमुळे निर्माण झालेल्या असंतोषालाही या चळवळीने संघटित दिशा दिली. २०२६ मधील नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहार, प्रश्नपत्रिका फुटीचे आरोप आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींमुळे लाखो विद्यार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. अनेक वर्षांच्या मेहनतीवर पाणी फिरल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. शिक्षणतज्ज्ञ, पालक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही स्पर्धा परीक्षांच्या विश्वासार्हतेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. न्याय्य आणि पारदर्शक परीक्षाव्यवस्था ही घटनात्मक समानतेचा अविभाज्य भाग असल्याचे अधोरेखित करत 'कॉकरोच जनता पार्टी'ने ६ जून २०२६




रोजी जंतर-मंतर येथे बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले. सुरुवातीला मोजक्या विद्यार्थ्यांपासून सुरू झालेले आंदोलन काही दिवसांतच राष्ट्रीय चळवळ बनले. विविध राज्यांतील विद्यार्थी, संशोधक, पालक, शिक्षक आणि सामाजिक कार्यकर्ते यात सहभागी झाले. जंतर-मंतरवरील हा संघर्ष शिक्षणव्यवस्था, स्पर्धा परीक्षांची विश्वासार्हता, युवकांचे भविष्य आणि शासनाच्या उत्तरदायित्वावरील व्यापक चर्चेचे केंद्र बनला. शांततामय आणि घटनात्मक मार्गाने चालवलेल्या या आंदोलनाने तरुणाईचा संयम आणि लोकशाहीवरील विश्वास अधोरेखित केला. सामाजिक माध्यमांवरील व्यापक प्रतिसाद, विविध राज्यांतील विद्यार्थी प्रतिनिधींचा सहभाग आणि शिक्षणक्षेत्रातील मान्यवरांच्या समर्थनामुळे आंदोलनाला नैतिक बळ मिळाले. हे केवळ विद्यार्थ्यांचे आंदोलन राहिले नाही; तर शिक्षणव्यवस्थेतील पारदर्शकता आणि संस्थात्मक प्रामाणिकतेसाठी उभारलेला व्यापक लोकशाही संघर्ष बनला. विरोधी पक्षांनी संसदेत आणि संसदेबाहेर हा प्रश्न उपस्थित केला, तर अनेक सामाजिक संघटनांनी आंदोलनाला उघड पाठिंबा दिला. या आंदोलनाला नवी ऊर्जा मिळाली ती पर्यावरणवादी आणि शिक्षणसुधारक सोनम वांगचुक यांच्या सहभागामुळे. त्यांनी जंतर-मंतरवर प्रत्यक्ष उपस्थित राहून बेमुदत उपोषण सुरू केले. त्यांच्या सहभागामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय माध्यमांचे लक्ष या आंदोलनाकडे वेधले गेले. शिक्षणातील प्रामाणिकता, समान संधी आणि पारदर्शकता या लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांचे संरक्षण करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचा संदेश त्यांनी दिला. देशभर मशाल मोर्चे, धरणे, मानवी साखळ्या आणि विद्यार्थी सभा आयोजित करण्यात आल्या. आंदोलनाचा विस्तार होत असताना पोलिसांनी अनेक आंदोलकांना ताब्यात घेतले. सोनम वांगचुक, अभिजीत दीपके, सौरव दास, आशुतोष रांका यांच्यासह अनेक विद्यार्थी कार्यकर्त्यांवरील कारवाईमुळे देशभर संतापाची लाट उसळली. विविध विद्यापीठांत निषेधसभा झाल्या आणि अनेक शहरांत ऐक्यदर्शक आंदोलने झाली. शांततामय आंदोलन हा भारतीय राज्यघटनेने दिलेला मूलभूत अधिकार असल्याचे अधोरेखित करत नागरिकांनी आंदोलकांच्या घटनात्मक हक्कांचे संरक्षण करण्याची मागणी केली. सलग ३६ दिवसांच्या संघर्षानंतर २५ जुलै २०२६ रोजी केंद्र सरकारने आंदोलनकर्त्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करून महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केले. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्याची घोषणा करण्यात आली. प्रश्नपत्रिका फुटीच्या पार्श्वभूमीवर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत, आंदोलनादरम्यान दाखल गुन्हे मागे घेण्याबाबत सकारात्मक भूमिका आणि 'सार्वजनिक परीक्षा कायदा, २०२४' अधिक प्रभावी करण्यासाठी आवश्यक सुधारणा करण्याची घोषणा करण्यात आली. तसेच राष्ट्रीय परीक्षा यंत्रणा (एनटीए) अधिक पारदर्शक, उत्तरदायी आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रशासकीय सुधारणा राबविण्याचे आश्वासन देण्यात आले. या संघर्षाचे महत्त्व केवळ मागण्या मान्य होण्यात नाही, तर संघटित, शांततामय आणि घटनात्मक जनआंदोलन शासनाला उत्तरदायी बनवू शकते, हा विश्वास अधिक दृढ करण्यात आहे. महाराष्ट्र, बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगणा, पश्चिम बंगाल आणि पंजाबसह अनेक राज्यांत निषेध मोर्चे व ऐक्यदर्शक कार्यक्रम झाले. पालक, शिक्षक आणि नागरी समाजानेही शिक्षणव्यवस्थेतील सुधारणांची मागणी अधिक ठामपणे मांडली. या आंदोलनातून सामाजिक संघटना, विद्यार्थी चळवळी आणि इतर जनआंदोलनांसाठी महत्त्वाचे धडे मिळतात. डिजिटल माध्यमे आणि प्रत्यक्ष जनआंदोलन यांचा समन्वय, स्पष्ट मागण्या, सातत्यपूर्ण संवाद, अहिंसक संघर्ष आणि प्रभावी जनसंपर्क या कोणत्याही यशस्वी चळवळीच्या मूलभूत अटी आहेत. सामाजिक माध्यमांवरील जनमत आणि प्रत्यक्ष लोकसहभाग यांची सांगड घातल्यास शासनव्यवस्थेवर प्रभावी लोकशाही दबाव निर्माण करता येतो, हे या आंदोलनाने सिद्ध केले. जंतर-मंतरवरील हा संघर्ष केवळ नीट परीक्षेपुरता मर्यादित राहिला नाही. तो भारतीय युवकांच्या राजकीय आणि सामाजिक प्रगल्भतेचे प्रतिक ठरला. न्याय, समान संधी, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि घटनात्मक मूल्यांच्या संरक्षणासाठी तरुणाई संघटितपणे संघर्ष करू शकते, हा संदेश या आंदोलनाने दिला. त्यामुळे भारतीय लोकशाहीतील उत्तरदायी शासन, सक्रिय नागरिक सहभाग आणि युवकांच्या लोकशाही भूमिकेचा हा संघर्ष एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून इतिहासात स्मरणात राहील.●●



भीमराव सरवदे,
मो. 9405466441

## हास्य

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

असे म्हणतात की, हास्य तो अनमोल हिरा आहे ज्याला आपण खरेदी न करताही वापरू शकतो. जोपर्यंत हा हिरा आपल्याजवळ आहे, तोपर्यंत सुंदर दिसण्यासाठी कोणत्याही इतर सौंदर्य प्रसाधनांची आवश्यकता नसते. एकवेळ अशी होती की, दररोज सकाळी आपण हसत हसत उठायचो. पण आता मात्र कितीतरी वेळा हसण्याशिवाय सायंकाळ होते ते कळतच नाही. कारण जबाबदारीच्या ओझ्याखाली हास्य कुठे गाडल्या गेले. याचा थांगपत्ता लागत नाही. आपल्या चेहऱ्यावरील हास्य हे आपल्या हक्काचे आहे असे आपण मानत असतो. पण आयुष्यात कधीकधी आम्ही त्या गोष्टीही गमावून बसतो, ज्या गोष्टी आपल्या आहेत असे आपण ठासून सांगत आलो. मित्रांनो! आयुष्य हे असेच असते. ' खो देते हैं, फिर खोजा करते है, यहीं खेल हम, जिंदगी भर खेला करते है' हास्य हे त्या ओटीपी सारखे असते जे वेळ निघून गेल्यावर इनव्हॅलिड होते. हास्याचा ओटीपी कधीपासून कामात येत नाही याचा विचार केला तर लक्षात येते की, जसजसे बालपण संपत जाते तसतसे हास्य देखील नाते तोडायला सुरुवात करते. मागे राहतात त्या केवळ आठवणी. माणसाचे काळानुसार वय वाढत जाते. पण आठवणी कधीही म्हाताऱ्या होत नसतात. जबाबदाऱ्या वाढल्या की मागे लागतात त्या चिंता, काळजी. अशावेळी आपल्या मनातल्या खऱ्या भावनांना व्यक्त न करता माणूस जगापुढे उसने हास्य आणतो. हे खोटेखोटे हसतांना मनात हाच विचार येतो की, 'मुफ्त में नहीं सिखा, उदासी में हँसने का हुनर, बदले में जिंदगी की, हर खुशी तबाह की है हमने'. विनामूल्य मिळालेल्या गोष्टी किती मौल्यवान असतात याची या कठीण परिस्थितीत जाणीव होते. आपले हक्काचे हास्य का हरवले? याचे उत्तर द्यायचेच झाले तर, 'किताब-ए-जिंदगी का हर सफ़ा पढ़ते रहे, हम अपने ही सवालों में उलझते रहें, जिसे मंजिल समझकर उम्र भर चलते रहे, वो रास्ते थे, और हम भटकते रहें, न शिकायत किसीसे, न कोई गिला रहा, बस वक्त के साथ, खुद ही बदलते रहे, आख़िर में जब हिसाब किया जिंदगी का, कुछ ख्वाब टूटते गए, फिर भी हम चलते रहे, हँसी के फूल थे कभी, अब ग़मों में सो बैठे,वक़्त की ऐसी मार पड़ी कि खुद को ही खो बैठे.'●●

# थोर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे



जागतिक कीर्तीचे साहित्य सम्राट, लोकशाहीर आणि क्रांतिकारी साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली (तेव्हाचा सातारा) जिल्ह्यातील वाटेगाव येथे वाळूबाई व भाऊराव साठे यांच्या पोटी झाला. विषमतावादी समाजव्यवस्थेमुळे त्यांना शिक्षणाची संधी मिळाली नाही. अवघे दीड दिवस शाळेत जाऊन शिक्षकांच्या भेदभावपूर्ण वागणुकीमुळे त्यांनी शाळा सोडली. मात्र, अन्याय सहन करायचा नाही आणि अन्याय करायचा नाही, हा जीवनमंत्र त्यांनी स्वीकारला. गरिबीमुळे बालपणापासूनच त्यांना हमाल, हॉटेल बॉय, बूट पॉलिश करणारा, चौकीदार, खाणकामगार, पाईपलाइन कामगार, पोस्टर लावणारा अशा अनेक प्रकारची श्रमाची कामे करावी लागली. या संघर्षमय जीवनातूनच त्यांच्या साहित्याची पायाभरणी झाली. त्यांनी समाजातील वास्तव अनुभवले आणि तेच आपल्या लेखणीतून मांडले. अवघे दीड दिवस शाळेत गेलेल्या अण्णाभाऊंनी मराठी साहित्याला अमूल्य योगदान दिले. त्यांनी ३५ कादंबऱ्या, १३ कथासंग्रह, १४ लोकनाट्ये, नाटके, पोवाडे, शाहिरी, प्रवासवर्णन आणि चित्रपटकथा लिहिल्या. त्यांचे साहित्य कल्पनाविलासावर नव्हे, तर वास्तववादी अनुभवांवर आधारित आहे. ते म्हणत, 'मी जे जीवन जगतो, पाहतो आणि अनुभवतो तेच लिहितो.' त्यामुळे त्यांच्या साहित्यामध्ये दलित, श्रमिक, कष्टकरी आणि उपेक्षित समाजाचे जिवंत चित्र उभे राहते. अण्णाभाऊंच्या साहित्याने समाजातील अन्याय, शोषण आणि विषमतेवर कठोर प्रहार केला. त्यांनी दीन-दलितांच्या वेदना, संघर्ष आणि स्वाभिमानाला शब्द दिले. त्यामुळे त्यांचे साहित्य सामान्य माणसाचे साहित्य बनले. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतील पात्रे काल्पनिक वाटत नाहीत; ती आपल्या आजूबाजूला जगणारी माणसे असल्याचा प्रत्यय येतो. १९५८ मध्ये महाराष्ट्र दलित साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले, 'ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलितांच्या तळहातावर तरलेली आहे.' या विधानातून त्यांनी श्रमिकांच्या श्रमाला सर्वोच्च स्थान दिले. समाजाचा खरा आधार हा कष्टकरी वर्ग आहे, ही त्यांची भूमिका होती. त्यामुळे प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेला त्यांनी वैचारिक आव्हान दिले. लोकशाहीर म्हणून त्यांनी शाहिरीचा उपयोग समाज जागृतीसाठी केला. पारंपरिक तमाशातील धार्मिक नमनाऐवजी त्यांनी मातृभूमी, छत्रपती शिवाजी महाराज, हुतात्मे आणि राष्ट्रपुरुषांना प्रथम वंदन करण्याची नवी परंपरा सुरू केली. प्रथम नमन मायभूच्या चरणा, छत्रपती शिवबा चरणा... अन्यायाविरुद्ध संघर्ष करणे, वीरांचे यशोगान करणे आणि लोकनिष्ठा जपणे, हाच शाहिरीचा धर्म असल्याचे त्यांनी सांगितले. अण्णाभाऊंच्या साहित्याला जगभर मान्यता मिळाली. त्यांच्या साहित्याचे रशियन, फ्रेंच, जर्मन, पोलिश, झेक यांसह २७ परदेशी भाषांत आणि अनेक भारतीय भाषांत भाषांतर झाले. त्यांच्या फकीरा या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा प्रथम पुरस्कार मिळाला. या कादंबरीच्या अनेक आवृत्त्या प्रकाशित झाल्या आणि तिच्यावर चित्रपटही निर्माण झाला. वैजयंता, वारणेचा वाघ आणि अशी ही साताऱ्याची तऱ्हा यांसारख्या त्यांच्या साहित्यावर आधारित चित्रपटांनाही राज्य व राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. अवघ्या चार दिवसांत त्यांनी 'मयुरा' ही कादंबरी पूर्ण केली, ही त्यांच्या विलक्षण प्रतिभेची साक्ष आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांना महाराष्ट्राचा 'मॅक्झिम गोर्की' असे संबोधले होते. वयाच्या केवळ ४९ वर्षांत त्यांनी सुमारे ८० ग्रंथांची निर्मिती केली. १९४८ मध्ये पॅरिस येथे होणाऱ्या जागतिक साहित्य परिषदेस त्यांना निमंत्रण मिळाले, तर सोव्हिएत रशियाने त्यांना 'सोव्हिएत लॅण्ड' पुरस्काराने गौरविले. अण्णाभाऊ साठे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित होते. त्यांनी लिहिले, 'जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव.' त्यांनी फकीरा ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केली. त्यामुळे त्यांची वैचारिक निष्ठा समता, सामाजिक न्याय आणि आंबेडकरी विचारांशी जोडलेली असल्याचे स्पष्ट होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही बहुजन, दलित आणि श्रमिक समाजाला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळालेले नाही, असे त्यांचे मत होते. म्हणूनच १६ ऑगस्ट १९४७ रोजी त्यांनी मुंबईत मोर्चा काढून 'ये आजादी झूठी है, देश की जनता भूखी है' अशी घोषणा दिली. सामाजिक आणि आर्थिक समतेशिवाय स्वातंत्र्य अपूर्ण आहे, ही त्यांची ठाम भूमिका होती. जगभर गौरव मिळूनही अण्णाभाऊंना आपल्या देशात अपेक्षित सन्मान लाभला नाही. आयुष्यभर त्यांनी गरिबी आणि उपेक्षा सहन केली. त्यांच्या निधनाच्यावेळी त्यांच्या झोपडीत तुटकी खाट, फाटकी चादर, रॉकेलचा दिवा, काही हस्तलिखिते आणि तुटकी पेन्सिल एवढीच संपत्ती होती. मात्र, कोणत्याही विद्यापीठात न शिकलेल्या या साहित्यसम्राटांच्या साहित्यावर अनेक संशोधकांनी पीएच.डी. प्राप्त केली. १८ जुलै १९६९ रोजी या महान साहित्यसूर्याचा अस्त झाला. परंतु त्यांचे साहित्य आजही सामाजिक परिवर्तन, समता, श्रमप्रतिष्ठा आणि मानवतेची प्रेरणा देत आहे. अण्णाभाऊ साठे हे केवळ मराठी साहित्याचे नव्हे, तर जगातील शोषितांच्या वेदनांना शब्द देणारे जागतिक साहित्यसम्राट होते. त्यांचा संघर्ष, त्यांची साहित्यनिर्मिती आणि सामाजिक बांधिलकी पुढील पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी राहील.●●

प्रकाश मेश्राम
मो. 9823919878

# अण्णाभाऊ साठे : लेखनाची प्रेरणा

समाजातील उपेक्षित, शोषित आणि वंचित घटकांच्या जीवनाला आपल्या सशक्त लेखणीतून शब्दबद्ध करणारे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्यातील तेजस्वी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या साहित्याने केवळ मराठी साहित्य समृद्ध केले नाही, तर सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला नवी दिशा दिली. अन्याय, विषमता, गरिबी, शोषण आणि मानवी वेदना यांना त्यांनी प्रभावी शब्द दिले. त्यांच्या साहित्यिक योगदानाचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिन 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये, तरुणांमध्ये आणि समाजात लेखनाची प्रेरणा निर्माण करणे, वाचन संस्कृतीला चालना देणे आणि साहित्यिक संवेदनशीलता विकसित करणे हा आहे. १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे जन्मलेल्या अण्णाभाऊ साठे यांचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गेले. औपचारिक शिक्षणाची संधी मर्यादित असली तरी जीवनातील कठोर अनुभवांनी त्यांना घडविले. मुंबईतील गिरणगावातील कष्टकरी जीवन, झोपडपट्ट्यांतील संघर्ष, जातीय विषमता आणि सामाजिक अन्याय यांचा त्यांनी जवळून अनुभव घेतला. त्यामुळे त्यांचे साहित्य वास्तववादी बनले. त्यांनी झोपडीतल्या माणसाचे अश्रू, घाम, संघर्ष आणि स्वाभिमान यांनाच आपल्या साहित्याचा केंद्रबिंदू बनविले. लोकशाहीर म्हणून लोकप्रिय असलेल्या अण्णाभाऊ साठे यांनी कादंबरी, कथा, लोकनाट्य, पोवाडे, लावण्या अशा विविध साहित्यप्रकारांत विपुल लेखन केले. श्रमिक, दलित, स्थलांतरित, शेतमजूर, स्त्रिया आणि वंचित समाजाचे वास्तव त्यांनी प्रभावीपणे मांडले. साहित्य हे केवळ मनोरंजनासाठी नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, ही त्यांची भूमिका होती. त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीत संघर्ष, समता, स्वाभिमान आणि मानवी प्रतिष्ठेचा आग्रह दिसून येतो. त्यांची 'फकिरा' ही कादंबरी मराठी साहित्यातील मैलाचा दगड मानली जाते. अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सामान्य माणसाच्या संघर्षाचे चित्रण करणारी ही कादंबरी आजही सामाजिक साहित्याचा मानदंड आहे. त्यांच्या कथा, पोवाडे आणि लोकनाट्यांनी समाजात सामाजिक जाणीव जागृत केली. लोकभाषेतील सहजता, ओघवती शैली आणि वास्तववादी आशयामुळे त्यांचे साहित्य सर्वसामान्यांच्या मनात घर करून राहिले. अण्णाभाऊ साठे यांनी कधीही वैयक्तिक यशासाठी लेखन केले नाही. समाजातील अन्याय उघड करणे, वंचितांना आवाज देणे आणि सामान्य माणसात आत्मविश्वास निर्माण करणे हा त्यांच्या लेखणीचा उद्देश होता. समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि मानवी मूल्यांचा त्यांनी सातत्याने पुरस्कार केला. त्यांच्या मते लेखक हा समाजाचा जागरूक प्रहरी असतो. तो केवळ घटनांचे वर्णन करत नाही, तर समाजाला विचार करण्यास प्रवृत्त करतो. त्यामुळे त्यांचे साहित्य आजही तेवढेच प्रेरणादायी आणि समकालीन वाटते. आजच्या डिजिटल युगात अभिव्यक्तीची अनेक माध्यमे उपलब्ध झाली आहेत. सामाजिक माध्यमे, ब्लॉग, संकेतस्थळे आणि ई-पुस्तकांमुळे प्रत्येकाला आपले विचार मांडण्याची संधी मिळाली आहे. मात्र ही संधी जबाबदारीने वापरणे आवश्यक आहे. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य आपल्याला शिकवते की लेखन हे प्रसिद्धीचे साधन नसून समाजाप्रती असलेल्या उत्तरदायित्वाची अभिव्यक्ती आहे. लेखकाने सत्य, विवेक, मानवी मूल्ये आणि सामाजिक परिवर्तन यांचा ध्यास घेतला पाहिजे. याच विचारातून शासनाने 'लेखन प्रेरणा दिन' साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाच्या परिपत्रकानुसार शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व, वादविवाद, स्थानिक साहित्यिकांची व्याख्याने, ग्रंथदिंडी, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन, परिसंवाद आणि कार्यशाळा आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, लेखन कौशल्य आणि साहित्यिक संवेदनशीलता विकसित होईल.लेखन ही केवळ शब्दांची मांडणी नसून विचारांची शिस्त, संवेदनशीलतेची अभिव्यक्ती आणि समाजाशी असलेल्या नात्याची जाणीव आहे. लेखनामुळे निरीक्षणशक्ती वाढते, चिकित्सक दृष्टी विकसित होते, भाषेवर प्रभुत्व मिळते आणि सामाजिक प्रश्नांकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता निर्माण होते. त्यामुळे 'लेखन प्रेरणा दिन' हा केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून विचारशील आणि जबाबदार नागरिक घडविण्याचा उपक्रम आहे. आज कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे माहितीचा वेग वाढला असला तरी सत्य, विवेक, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारी जपणाऱ्या लेखनाची गरज अधिक वाढली आहे. अण्णाभाऊ साठे यांनी लेखणीला परिवर्तनाचे शस्त्र बनविले; आजच्या पिढीने तीच लेखणी ज्ञान, विज्ञान, संविधानिक मूल्ये आणि मानवतेच्या प्रसारासाठी वापरण्याची गरज आहे. अण्णाभाऊ साठे यांचे जीवन संघर्ष, जिद्द आणि सर्जनशीलतेचे प्रेरणादायी उदाहरण आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी जागतिक कीर्तीचे साहित्यिक म्हणून स्थान निर्माण केले. त्यांनी सिद्ध केले की लेखक घडण्यासाठी संपन्न साधने नव्हे, तर जिद्द, संवेदनशीलता आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी आवश्यक असते. १ ऑगस्ट रोजी साजरा होणारा 'लेखन प्रेरणा दिन' हा केवळ एका महान साहित्यिकाच्या जयंतीचा दिवस नसून विचार, वाचन, लेखन आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा उत्सव आहे. प्रत्येक विद्यार्थी, शिक्षक, संशोधक आणि साहित्यप्रेमीने या निमित्ताने वाचन, चिंतन आणि समाजहिताचे लेखन करण्याचा संकल्प केला, तर तीच अण्णाभाऊ साठे यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या लेखणीने पेटविलेली सामाजिक जागृतीची मशाल ज्ञान, समता, न्याय आणि मानवतेच्या प्रकाशाने अधिक तेजस्वी करणे, हाच 'लेखन प्रेरणा दिनाचा' खरा संदेश आहे.●●



डॉ. राजेंद्र बगाटे
मो. 9960103582



# अण्णाभाऊंची आंबेडकरांप्रती आंतरिक जवळीक

जग बदल घालुनी घाव, सांगुनी गेले मला भिमराव'! अण्णाभाऊ साठे यांच्या लेखणीला लहुजी वस्ताद साळवे यांच्या कुऱ्हाडीची धार, फकिराच्या तलवारीची चमक, महात्मा फुले यांच्या आसुडाची धग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवमुक्तीच्या संघर्षाची प्रेरणा लाभली होती. वाटेगावातून मुंबईपर्यंत पायी चालत आलेले अण्णाभाऊ पुढे रशियापर्यंत पोहोचले; परंतु या देशातच त्यांना उपेक्षा आणि दारिद्र्याचा सामना करावा लागला. ज्ञान आणि संघर्षाचा मार्ग स्वीकारणाऱ्या बहुजन समाजातील अनेकांना जशी जातीव्यवस्थेने उपेक्षा दिली, तशीच उपेक्षा अण्णाभाऊंनाही सहन करावी लागली. तुकाराम उर्फ अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे भाऊराव आणि वालूबाई यांच्या पोटी झाला. दीड दिवस शाळेत गेलेल्या अण्णाभाऊंना जातीय भेदभावामुळे शिक्षण घेता आले नाही. गुन्हेगार जातीचा शिक्का आणि वर्णव्यवस्थेच्या जोखडामुळे त्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्यात आले. उपजीविकेसाठी साठे कुटुंबाने दोनशे मैलांचा प्रवास करून मुंबई गाठली. उपाशीपोटी आणि अनवाणी पायांनी केलेला हा प्रवास त्यांच्या संघर्षमय आयुष्याचा प्रारंभ होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे मनुस्मृतीचे दहन करून बहुजन समाजाच्या गुलामगिरीविरुद्ध संघर्षाचा मार्ग दाखविला. मनुस्मृतीने शूद्र आणि अतिशूद्र म्हणून विभागलेल्या बहुजन समाजाला सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक गुलामगिरीत ठेवले होते. बहुसंख्य समाजाचे तुकडे करून त्यांना दुर्बल बनविण्याचे काम या व्यवस्थेने केले. डॉ. बाबासाहेबांनी शिक्षण, संघटन आणि संघर्षाचा मार्ग दाखवून या समाजाला स्वाभिमानाची जाणीव करून दिली. अण्णाभाऊ साठे म्हणत, “पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून ती गरीब, कष्टकरी आणि दलितांच्या तळहातावर तरलेली आहे.” या विचाराने त्यांनी साहित्यविश्वात खळबळ उडवून दिली. सुरुवातीला ते कामगार चळवळीशी जोडले गेले; परंतु पुढे त्यांच्या विचारांचा विस्तार मानवमुक्तीच्या व्यापक ध्येयाकडे झाला. आंबेडकरी विचारांशिवाय दलित, पीडित आणि बहुजन समाजाचा विकास शक्य नाही, ही जाणीव त्यांना झाली. म्हणूनच त्यांनी आपली श्रेष्ठ कादंबरी 'फकिरा' ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केली. अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यावर स्पष्ट शब्दांत लिहून ठेवले, “जग बदल घालुनी घाव, सांगुनी गेले मला भिमराव.” या ओळींचा अर्थ असा की, समाजातील विषमता, अन्याय आणि शोषण दूर करण्यासाठी विचारांचा घाव घालावा लागेल आणि तो फुले-आंबेडकरी विचारांचा असला पाहिजे. स्वाभिमान जागवून न्यायासाठी लढण्याची प्रेरणा या विचारधारेत आहे, हे अण्णाभाऊंनी ओळखले होते. समाजातील जातीय विषमता आजही कायम आहे. मांग समाजाने तयार केलेल्या वस्तू सर्वांच्या घरात वापरल्या जातात; परंतु त्या वस्तू तयार करणाऱ्या माणसाला मात्र समानतेची वागणूक दिली जात नाही. ग्रामीण भागात मातंग स्त्रीशिवाय बाळंतपण होत नाही; पण त्याच स्त्रीला सामाजिक सन्मान मिळत नाही. या विसंगतीवर अण्णाभाऊंनी आपल्या साहित्याद्वारे प्रखर भाष्य केले. अण्णाभाऊ सांगत की, आपला उद्धार आपल्यालाच करावा लागेल. कोणतीही दैवी शक्ती किंवा अंधश्रद्धा समाजाची मुक्ती करू शकत नाही. शिक्षण, विचार आणि संघटन हाच मुक्तीचा मार्ग आहे. उपवास, नवस आणि अंधश्रद्धांवर खर्च करण्यापेक्षा मुलांच्या शिक्षणावर खर्च करणे आवश्यक आहे. दुःख हे मागील जन्माच्या पापाचे फळ नसून सामाजिक विषमतेचे परिणाम आहेत, असे ते स्पष्टपणे मांडत.●●



पंजाबराव ब. वर
मो. ९९२२९२४६८४

# कॉम्रेड अण्णाभाऊ साठे यांच्या सहचारिणी
# कॉ. जयवंताबाई साठे

साहित्यरत्न लोकशाहीर कॉम्रेड अण्णाभाऊ साठे यांच्या यशामागे त्यांच्या द्वितीय पत्नी कॉ. जयवंताबाई साठे यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे होते. २६ फेब्रुवारी १९९३ रोजी मुंबई येथे त्यांचे निधन झाले. त्या काळात बाबरी मशीद पाडल्यानंतर मुंबई धार्मिक दंगलींनी होरपळत असल्याने त्यांच्या निधनाची वार्ता अनेकांपर्यंत उशिरा पोहोचली. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ २२ मार्च १९९३ रोजी नवाकाळ दैनिकाने 'अण्णाभाऊ आणि जयवंताबाई' या शीर्षकाखाली संपादकीय लिहून त्यांच्या त्यागमय सहजीवनाला अभिवादन केले. अण्णाभाऊ साठे आणि जयवंताबाई यांची कहाणी ही केवळ पती-पत्नीची नव्हे, तर समतेच्या विचारासाठी आयुष्य अर्पण केलेल्या दोन सहकाऱ्यांची प्रेरणादायी गाथा आहे. अण्णाभाऊ कम्युनिस्ट पक्षात कार्यरत होते, तर जयवंताबाई भारतीय महिला फेडरेशनच्या सक्रिय कार्यकर्त्या होत्या. कॉ. अहिल्या रांगणेकर, तारा रेड्डी, कमल दोंदे, प्रेमा पुरव यांच्यासारख्या लढाऊ महिलांसोबत त्यांनी सामाजिक चळवळीत काम केले. समता, सामाजिक न्याय आणि परिवर्तनाची समान ध्येये यामुळे दोघे एकमेकांच्या जवळ आले आणि त्यांचे सहजीवन सुरू झाले. जयवंताबाई औपचारिक शिक्षणाने अशिक्षित असल्या तरी जीवनानुभवाने समृद्ध होत्या. गिरणगावातील कम्युनिस्ट पक्षाच्या सभांमध्ये त्या अण्णाभाऊंची क्रांतिकारी गीते आणि शाहिरी ऐकत असत. “जग बदल घालुनी घाव”सारख्या गीतांनी त्यांच्या मनात अण्णाभाऊंबद्दल आदर आणि प्रेम निर्माण झाले. पक्षाच्या कामातून वाढलेल्या परिचयाचे रूपांतर प्रेमात झाले. अण्णाभाऊंचे पहिले लग्न झाल्याची माहिती असूनही त्यांनी त्यांच्यासोबत संसार करण्याचा निर्णय घेतला. मुंबईत अण्णाभाऊंच्या संघर्षमय आयुष्यात जयवंताबाई सावलीसारख्या त्यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या. अण्णाभाऊंनी निर्धास्तपणे लेखन करावे म्हणून त्यांनी गिरणीत, खाजगी कंपनीत, रुग्णालयात दाई म्हणून, भाजी विक्रीसह अनेक कामे केली. घरखर्चापासून शाई, पेन, कपडे आणि इतर सर्व गरजा त्यांनी स्वतःच्या कष्टातून भागवल्या. अण्णाभाऊंना आर्थिक विवंचनांची झळ लागू नये, यासाठी त्यांनी स्वतःचे संपूर्ण आयुष्य वेचले. घाटकोपरच्या चिरानगर झोपडपट्टीतील दहा बाय बारा फुटांच्या झोपडीत अण्णाभाऊंच्या अनेक श्रेष्ठ साहित्यकृती जन्माला आल्या. फकीरासारखी कालजयी कादंबरीही याच झोपडीत लिहिली गेली. पावसात झोपडीत पाणी शिरायचे, वीज नव्हती, कंदिलाच्या उजेडात अण्णाभाऊ लेखन करीत असत. जयवंताबाई घर नीटनेटके ठेवत, त्यांची काळजी घेत आणि प्रत्येक लेखनकृतीच्या निर्मितीत मूक सहभाग नोंदवत असत. त्यांची कन्या शकुंतला सतपाळ यांनी सांगितलेल्या आठवणीत फकीरा लिहिताना अण्णाभाऊ रात्रंदिवस लेखनात इतके तल्लीन झाले होते की थकव्याने ते लेखनाच्या टेबलावरच बेशुद्ध पडले. जयवंताबाई आणि शकुंतलाने त्यांना सावरले. घामाने भिजलेल्या वहीची पाने, तापाने फणफणणारे शरीर आणि तरीही कादंबरी पूर्ण करण्याची त्यांची जिद्द हा प्रसंग अण्णाभाऊंच्या साहित्यनिष्ठेचा आणि जयवंताबाईंच्या सेवाभावाचा जिवंत दस्तऐवज आहे. फकीराला महाराष्ट्र शासनाचे पारितोषिक मिळाले आणि अण्णाभाऊ कीर्तीच्या शिखरावर पोहोचले. त्यांच्या अनेक कादंबऱ्यांवर चित्रपट निर्माण झाले. सत्कार, सन्मान आणि लोकप्रियता वाढत असताना जयवंताबाई मात्र नेहमी पडद्यामागेच राहिल्या. अण्णाभाऊ व्यासपीठावर असत, तर त्या प्रेक्षकांत बसून त्यांच्या यशाचा आनंद घेत असत. त्यांच्या आनंदातच स्वतःचे समाधान मानणे, हीच त्यांची खरी संपत्ती होती. मात्र चित्रपटसृष्टीतील वातावरणामुळे अण्णाभाऊंना दारूचे व्यसन लागले आणि त्यांच्या आयुष्यात दुःखद वळण आले. व्यसनाचा तीव्र तिरस्कार करणाऱ्या जयवंताबाईंनी त्यांना अनेकदा समजावले, परंतु अण्णाभाऊ व्यसनाच्या विळख्यातून बाहेर पडू शकले नाहीत. ध्येयवादी अण्णाभाऊ पुन्हा उभे राहावेत, अशी त्यांची प्रामाणिक इच्छा होती. अखेर मतभेद वाढले आणि त्या मुलीकडे राहायला गेल्या. तरीही दोघांमधील प्रेम कधीच संपले नाही. १८ जुलै १९६९ रोजी अण्णाभाऊंचे निधन झाले. त्याच्या आदल्या दिवशी त्यांनी 'टिळा लाविते मी रक्ताचा' या चित्रपटाची तिकिटे खास जयवंताबाईंसाठी पाठविली होती. त्यांच्या मनात शेवटपर्यंत जयवंताबाईंबद्दलचे प्रेम कायम होते. अण्णाभाऊंच्या निधनानंतर तब्बल चोवीस वर्षे जयवंताबाई त्यांच्या आठवणी जपत राहिल्या. नवोदित साहित्यिकांना त्यांनी अण्णाभाऊंचे साहित्य उपलब्ध करून दिले, संशोधकांना मदत केली आणि भेटायला येणाऱ्यांना अण्णाभाऊंच्या कार्याची माहिती सांगत राहिल्या. कॅन्सरसारख्या असाध्य आजाराने ग्रस्त असतानाही त्या रुग्णालयात भेट देणाऱ्यांना अण्णाभाऊंची पुस्तके भेट म्हणून देत असत. जयवंताबाईंचे संपूर्ण जीवन त्याग, निष्ठा, संघर्ष आणि ध्येयनिष्ठेचे प्रतिक होते. अण्णाभाऊ जिवंत असताना त्या अण्णाभाऊमय होत्या आणि त्यांच्या निधनानंतरही त्यांच्या विचारांचा वारसा जपत राहिल्या. त्यांनी प्रसिद्धीची अपेक्षा कधी केली नाही; परंतु अण्णाभाऊंच्या साहित्यनिर्मितीमागील त्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. म्हणूनच जयवंताबाईंचे जीवन हे केवळ एका महान साहित्यिकाच्या पत्नीचे नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात खंबीरपणे उभ्या राहिलेल्या समर्पित सहचारिणीचे प्रेरणादायी चरित्र आहे. त्याग, साहस, निष्ठा आणि समतेच्या विचारांशी अखंड नाते जोडून जगलेल्या कॉ. जयवंताबाई साठे यांना हीच खरी आदरांजली.●●



प्रा. गौतम निकम
मो. ९४२३९१५५१०



